# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे-०४

## * प्रकटन *

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं.१७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

त्यानुसार फेब्रुवारी/मार्च २०२० मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे नियमित शुल्काने भरण्याबाबत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यासंबंधिच्या तारखां व करावयाच्या कार्यवाही संदर्भातील सूचना खालीलप्रमाणे

१. इ.१२वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या मुदतवाढीबाबतच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र | नियमित शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा | तपशील |
|---|---|---|
| १ | **मंगळवार** दिनांक २७/०८/२०१९ ते **मंगळवार** दिनांक १०/०९/२०१९ | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरणे. |
| २ | **बुधवार** दिनांक २८/०८/२०१९ ते **बुधवार** दिनांक ११/०९/२०१९ | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, विहित शुल्क व मुळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये जमा करणे. |
| ३ | **सोमवार** दिनांक १६/०९/२०१९ | कनिष्ठ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, विहित शुल्क, मुळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी **http://form17.mh-hsc.ac.in** या **संकेतस्थळचा**वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

४. विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत) ,मूळप्रत नसल्यास व्दितीयप्रत व त्यासंबंधितचे स्टॅप पेपरवरील प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वत:चा सद्याचा पासपोर्ट आकारातील फोटो इत्यादी कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.

५. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत.

६. संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार असल्याने विद्यार्थ्याने त्यांचा **ई-मेल आयडी व पुढील संपर्कासाठी मोबाईल क्रमांक अनिवार्य (compulsory) आहे.**. तसेच ऑनलाईन भरलेल्या भरलेल्या संपूर्ण अर्जाची प्रिंटआउट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

७. विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंटआउट , विहित शुल्क व मूळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

८. खाजगी विद्यार्थ्यासाठी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे-
**इ.१२वी - रू.५००/- नोंदणी शुल्क + रू.१००/- प्रक्रिया शुल्क (processing fee)**

९. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्यांनी करावयाची आहे. याच कनिष्ठ महाविद्यालयाव्दारे परीक्षा अर्ज,प्रकल्प,प्रात्यक्षिक/तोंडी श्रेणी परीक्षा दयावयाच्या आहेत.

१०. विहित शुल्क रोखीने क.महाविद्यालयात जमा करावयाचे आहे. विद्यार्थ्यांनी अर्जासोबत दिलेल्या पावत्यांपैकी विद्यार्थ्यांसाठीच्या प्रतीवर कनिष्ठ महाविद्यालयाकडून स्वाक्षरी व शिक्का घेवून ती स्वत:कडे ठेवावी.

११. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/ प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी. व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ /कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडून माहिती प्राप्त करून घ्यावी.

१२.ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दुरध्वनी **क्र.०२०-२५७०५२०८/२५७०५२०७/२५७०५२७१** वर संपर्क साधावा.

१३. विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी अर्जासोबत छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे कनिष्ठ महाविद्यालयांकडून निर्धारित कालावधीनंतर परत घेवून जाण्याची दक्षता घ्यावी.

१४. पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी ( EC ) प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination form) मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह त्या-त्या कनिष्ठ महाविद्यलयामार्फत भरणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी विद्यार्थ्यांनी घ्यावी.

दिनांक-२७/०८/२०१९

( श्री. एस.एम.आवारी )
विभागीय सचिव,
कोल्हापुर विभागीय मंडळ,कोल्हापूर

Acer/msword/letter